अकृषि विद्यापीठाशी संलग्नित
महाविद्यालयातील प्राचार्यांना
अध्यापनाचा कार्यभार देण्याबाबत......

**महाराष्ट्र शासन,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक संकीर्ण २०११/(४०४/११)-विशि-१,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ ऑक्टोबर, २०११.

**वाचा :-**

१) शासन निर्णय शिक्षण व रोजगार विभाग क्र.एनजीसी २०८०/१६०२८४/(५९८७)-युनि-२,दि.१ सप्टेंबर,१९८१.
२) विद्यापीठ अनुदान आयोगाची अधिसूचना क्र.F-3.1/2009, दिनांक ३० जून, २०१०.
३) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(२५/११)-विशि-१, दि.१५ फेब्रुवारी, २०११.
४) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण २०११/(५७/११)-विशि-१, दि.१५ मार्च, २०११.

**प्रस्तावना :-** राज्यातील अकृषि विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील प्राचार्यांना संदर्भाधीन क्र.१ येथील दिनांक १ सप्टेंबर, १९८१ च्या शासन निर्णयान्वये किमान घड्याळी ४ तासांचा कार्यभार देण्यात आलेला होता. तथापि, .विद्यापीठ अनुदान आयोगाच्या संदर्भाधीन दिनांक ३० जून, २०१० च्या अधिसूचनेमध्ये प्राचार्यांना अध्यापनाचा कार्यभार देण्याबाबत कोणताही उल्लेख केलेला नसल्यामुळे संदर्भाधीन के.३ येथील दि.१५ फेब्रुवारी, २०११ च्या शासन निर्णयान्वये प्राचार्यांना अध्यापनाच्या विवक्षित कार्यभारातून सूट देण्यात आलेली होती. त्यानंतर संदर्भाधीन क्र.४ येथील दिनांक १५ मार्च, २०११ च्या शासन निर्णयान्वये प्राचार्यांना पर्यावरण विषयामध्ये अध्यापन करण्याची ऐच्छिक मुभा ठेवण्यात आलेली होती.

२. शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट देण्यात आल्यामुळे त्यांच्या हिश्श्याचा कार्यभार महाविद्यालयात कार्यरत असलेल्या अर्धवेळ शिक्षकांच्या कार्यभारात वर्ग करुन अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षक करण्याची मागणी होत आहे. प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारापासून सूट देऊन त्यांचा कार्यभार अर्धवेळ शिक्षकांमध्ये वर्ग करुन सदर शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षकांचा दर्जा देण्याचा हेतू नव्हता. अशा प्रकारे अर्धवेळ शिक्षकांना पूर्णवेळ शिक्षक केल्यास त्याचप्रमाणे प्राचार्यांचा अध्यापनाचा कार्यभार इतर शिक्षकांना शिकविण्यासाठी नियुक्त केल्यास शासनाला अनावश्यक अतिरिक्त आर्थिक भार सोसावा लागेल.

२ ८ DEC 2011

३. त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ च्या कलम २(३४) मध्ये अध्यापकाची व्याख्या स्पष्ट केलेली असून, त्यामध्ये प्राचार्यांचा समावेश आहे. प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट दिल्यामुळे

त्यांच्यावर केवळ प्रशासकीय स्वरुपाची जबाबदारी राहते. अधिनियमातील उक्त तरतूदीनुसार प्राचार्य हे पद अध्यापक संज्ञेत मोडत असल्यामुळे त्यांच्यावर अध्यापनाची जबाबदारी असणे क्रमप्राप्त आहे. प्राचार्यांना अध्यापनाच्या जबाबदारीतून सूट देणे, ही बाब अधिनियमातील उक्त तरतूदीशी विसंगत होईल. त्याचप्रमाणे महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार विद्यापीठातील विविध अभ्यासमंडळे, समित्या, परिषद व इतर प्राधिकरणावर नियुक्ती करण्यासाठी अध्यापनाचा अनुभव आवश्यक असतो. प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट दिल्यास उक्त प्राधिकरणावरील नियुक्तीसाठी वंचित रहावे लागेल. वरील सर्व बाबी विचारात घेता, प्रार्चायांना अध्यपनाच्या कार्यभारामधून देण्यात आलेली सूट रद्द करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

४. वरील सर्व बाबी विचारात घेऊन शासन याद्वारे पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(i) संदर्भाधीन क्र.३ येथील दिनांक १५-२-२०११ च्या शासन निर्णयातील परिच्छेद २ मध्ये प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारापासून देण्यात आलेली सूट रद्द करण्यात येत आहे.

(ii) प्राचार्यांना किमान घड्याळी ४ तासाचा अध्यापनाचा कार्यभार अनिवार्य करण्यात येत आहे.

(iii) प्राचार्यांना पर्यावरण, फाऊंडेशन कोर्स व तत्सम विषय शिकविण्याची मुभा असेल.

(iv) प्राचार्यांना अध्यापनाच्या कार्यभारातून सूट दिल्यामुळे त्यांचा कार्यभार इतर शिक्षकांना वर्ग करुन अर्धवेळ शिक्षकास पूर्णवेळ किंवा नवीन अर्धवेळ शिक्षक निर्माण करण्यास विभागीय सह संचालकांनी त्यांच्या स्तरावर मान्यता दिली असल्यास अशी मान्यता तात्काळ रद्द समजण्यात यावी.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक २०१११०१९१११२५३८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

(विकास तु. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

---

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४. महाराष्ट्र
(संलग्नता विभाग - २६०९०८९,२६०९१३६)
फॅक्स : ००९१-०२३१-२६९३२९४, २६९१५३३ व २६९२३३३.

संदर्भ : जा.क्र./संलग्नता/टे.१/युजीके/ 380

दिनांक : 28 DEC 2011

प्राचार्य, संलग्न महाविद्यालये व संचालक, मान्यताप्राप्त शिक्षणसंस्था यांना प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

संचालक,
महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ,